| (CNR NO.MHNS130014862023) | **<u>नियमित दिवाणी दावा क्र. २१७/२०२३</u>**<br>एसबीआय पिंपळगांव वि. दशरथ त्रंबक गायकवाड |
|---|---|

## <u>निशाणी क्र.१२ खालील आदेश</u>

१. प्रस्तूत अर्ज हा प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करणेकामी झालेला विलंब माफ होवुन मिळणेसाठी केलेला आहे. अर्जातील प्रतिवादीचे कथन ऐकले.

२. प्रतिवादी यांनी असे कथन केले की, सदर दाव्याचे समन्सची बजावणी या प्रतिवादीवर करण्यात आलेली आहे. परंतु समन्स सोबत वादीनी दाव्यासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांच्या नक्कला प्रतिवादीला मिळालेल्या नव्हत्या. त्यामुळे अशा परिस्थीतीत सदर दाव्यात प्रतिवादी हे मुदतीत कैफियत दाखल करु शकलेले नाहीत व त्यांना नमुद कारणास्तव त्यांना कैफियत दाखल करण्यास सुमारे २ महिने १३ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदर विलंब त्यांनी हेतुपुर्वक केला नाही. अर्ज मंजुर न झाल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. प्रतिवादी यांचा प्रस्तूतचा अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल न केल्यामुळे सदरचा अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला.

४. प्रतिवादीस जबाब/कैफीयत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकारांचे म्हणणे दाखल होणे व त्यांची योग्य बाजू मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश:

## आदेश

१. अर्ज नि.क्र. १२ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

KOLEKAR PRASAD DIPAK
Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2025.11.11 16:04:37 +0530

**(पी.डी. कोळेकर)**

दिनांकः– ११/११/२०२५

सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर.,
पिंपळगांव बसवंत